# <u>जाहिर सुचना</u>

<u>विषयः</u>- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था/ खाजगी कंपनी मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अनुभवी अशासकीय संस्थांना/ खाजगी कंपनीना कळविण्यात येते की, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या इच्छुक धर्मादाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगर पालिकेत नोंदणीकृत असलेल्या अनुभवी अशासकीय संस्था , मजूर सहकारी संस्था ,सेवा सहकारी संस्था ,बेरोजगार सेवा सहकारी संस्था ,औदयोगिक सेवा सहकारी संस्था व खाजगी कंपनी या संस्थांकडून /कंपनीकडून मंजुरी मिळाल्याच्या पुढच्या सहा महिन्याच्या कालावधीकरिता अतिक्रमण निर्मूलन वाहनांवर एकूण ०६ कंत्राटी कामगार पुरविण्याकरिता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहे.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षण अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मूलन ), बृहन्मुंबई महानगर पालिका एफ / दक्षिण विभाग कार्यालय , पहिला मजला ,खोली क्र . १, डॉ.आंबेडकर मार्ग , परळ , मुंबई-४०००१२,येथे रु . ३३००/-अधिक १८% वस्तू व सेवा कर असे एकूण रुपये ३८९४/-आकारून (ना परतावा) रोख स्वरूपात चलन काढून
दि. 10 / 10 / २०२४ ते दि . 14 / 10 /२०२४ या दिवशी सकाळी १०. ३० ते ०१. ०० वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात तसेच आवश्यक कागद्पत्रांसहित सिलबंद अर्ज दि . 15 / 10/२०२४न पर्यंत दुपारी ०१. ०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते एफ / दक्षिण विभाग येथे , पहिला मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे . नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही .

लॉटरी तारीख दि . / /२०२४ रोजी दुपारी वाजता निश्चित करण्यात आलेली आहे .

Sd/-

SR.LICENCE INSPECTOR {ENCHROCMENT}